दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व अ‍ॅडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक ३४७ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.१ ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# सीएससी केंद्र चालकाने हडपले लाडक्या बहिणींचे पैसे

## ७१ जणांचे आधार कार्ड वापरुन मिळवले ३ लाख रुपये, नांदेड येथील प्रकार

**नांदेड (वृत्तसंस्था)-राज्य सरकारने महिलांसाठी आणलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत अनेकजण गैरव्यवहार करून पैसे हडपण्याचे प्रकार समोर येत आहेत. सातारा, अकोला जिल्ह्यातील प्रकरणे ताजी असतानाच आता नांदेड जिल्ह्यात देखील त्यापेक्षा वेगळा प्रकार समोर आला आहे. नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील एका सीएससी केंद्र चालकाने आधार कार्डवर खाडाखोड करून लाडक्या बहिणींचे सुमारे ३ लाख रुपये हडप केले आहेत. हा प्रकार समोर आल्यानंतर प्रशासनाने चौकशीचे आदेश दिले आहेत. आपले बिंग फुटताच केंद्र चालक फरार झाला आहे.**

नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील मनाठा येथील सीएससी केंद्र चालकाने लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरताना महिलांच्या आधारकार्डसोबत छेडछाड केली. पोर्टलवर महिलांचे आधारकार्ड नंबर टाकण्याऐवजी त्यांच्या पतीचे आधारकार्ड नंबर टाकले. त्यानंतर रोजगार हमी योजनेचे पैसे आणि इतर योजनांचे पैसे आले आहेत, असे सांगून त्याने अनेकांचे आधारकार्ड आणि बँकेचे पासबुक जमा करून घेतले. याच कागदपत्रांच्या आधाराने त्याने महिलांच्या खात्यात आलेले लाडकी बहीण योजनेचे पैसे स्वत:च्या खात्यात जमा करून घेतले. लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यावर आल्यानंतर रोजगार हमी योजनेचे पैसे आले आहेत, असे सांगून त्या केंद्र चालकाने पुरुषांचे अंगठे घेतले. त्यानंतर बँकेत जमा झालेली रक्कम काढून घेतली.



### याआधी गैरव्यवहार करुन योजनेचे पैसे लाटण्याचा प्रयत्न

दरम्यान, याआधीही गैरव्यवहार करून लाडकी बहीण योजनेचे पैसे लाटण्याचा प्रकार सातारा आणि अकोला जिल्ह्यात उघडकीस आला होता. सातारा येथील एका व्यक्तीने आपल्या पत्नीचे २८ प्रकारचे वेगवेगळे फोटो काढून योजनेचे पैसे मिळवले होते. मात्र सरकारच्या संगणकीय प्रणालीत हा प्रकार उघड झाला होता. यानंतर त्या व्यक्तीला सरकारची फसवणूक केल्याबद्दल तरुंगात टाकले होते. अजित पवार यांनी देखील हा किस्सा एका सभेत सांगितला होता. तर अकोला येथील सहा पुरुषांनी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज केला होता. मात्र प्रशासनाच्या सीडींग प्रोसेमध्ये ही बाब लक्षात आली. त्यानंतर महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने त्या सहा पुरुषांचे आधारकार्ड निलंबित करण्यात आले. आता त्या सहा जणांना आधारकार्डवर मिळणाऱ्या कोणत्याही योजनांचा लाभ घेता येणार नाही.

### केंद्र चालकावर गुन्हा दाखल

दरम्यान, हा प्रकार उघडकीस आल्यानंतर नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी सांगितले की, या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत. या गैरव्यवहारात कोण कोण सहभागी आहेत, ते चौकशी झाल्यानंतर समोर येतील. संबंधित सीएससी केंद्र चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ७१ जणांच्या खात्यातील पैसे उचलले

या केंद्र चालकाने जवळपास ७१ जणांच्या आधार क्रमांकाचा वापर करून त्यांच्या परस्पर ३ लाख १९ हजार ५०० रुपये उचलले. मनाठा या गावातील ३८ तर बामणी फाटा गावातील ३३ जणांच्या खात्यातील पैसे उचलण्यात आले आहेत. अनेकांच्या हा प्रकार लक्षात आल्यानंतर सीएससी केंद्र चालकाचा प्रकार उघडकीस आला.



# डेंगूने पत्नीचा मृत्यू,विरहाने पतीने संपवले जीवन; सात महिन्याची चिमुकली पोरकी

**इंदापूर । प्रतिनिधी**

मदनवाडी येथे हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. डेंगूने पत्नीचा मृत्यू झाल्यानंतर तिच्या विरहाने व्यथित झालेल्या स्वप्नील प्रदीप सुतार (वय २४) यांनी आत्महत्या केली. त्यांची एकुलती एक सात महिन्यांची मुलगी दुर्वा पोरकी झाली असून तिच्या भविष्यासाठी मदतीचे आवाहन करण्यात येत आहे.

स्वप्नील सुतार व त्यांच्या पत्नी श्रावणी यांचा सुखाचा संसार सुरू होता. मात्र दोन दिवसांपूर्वी डेंगूने श्रावणी यांचा मृत्यू झाला, ज्यामुळे स्वप्नील प्रचंड मानसिक तणावात होते. आज दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी स्वप्नील आपल्या नातेवाईकांसोबत घरात असताना, मी आता थकलो आहे, आराम करतो, असे सांगून घरात निघून गेले. नंतर नातेवाईकांनी त्याला हाका मारल्या, मात्र प्रतिसाद न मिळाल्याने खिडकीतून पाहिले असता, स्वप्नील लोखंडी अँगलला नॉयलॉनच्या दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. तातडीने त्यांना ग्रामीण रुग्णालय, भिगवण येथे नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.स्वप्नीलच्या या अचानक निधनामुळे संपूर्ण मदनवाडी गावात शोककळा पसरली आहे. आई-वडिलांचे छत्र हरवल्याने दुर्वा ही सात महिन्याची चिमुकली पोरकी झाली आहे. दुर्वाच्या भविष्यासाठी मदतीचे आवाहन करण्यात आले असून, सर्वांना तिच्या शिक्षणासाठी आणि देखभालीसाठी मदत करण्याचे आवाहन केले आहे .

स्वप्नीलचा चुलत भाऊ संतोष सुतार यांनी घटनेची माहिती दिली असून, पुढील तपास पोलीस हवालदार शैलेश हंडाळ करीत आहेत.



### कापूस-सोयाबीन अनुदान योजना- शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी

# ४९ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात २३९८ कोटी रुपये अनुदान वितरित

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिलेल्या शब्दांनुसार मागील वर्षी भाव पडल्याने नुकसान झालेल्या राज्यातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे अर्थसहाय्य करण्याच्या योजनेतुन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण प्रणालीची कळ दाबून प्रत्यक्ष शेतकऱ्यांना अर्थसहाय्य वितरणाची सुरुवात करण्यात आली. याद्वारे एका क्लिकवर सुमारे ४९ लाख ५० हजार हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे दोन हेक्टर च्या मर्यादेत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर २३९८ कोटी ९३ लक्ष रुपये रक्कम वर्ग करण्यात आली.



२०२३ च्या खरीप हंगामात एकूण ९६ लाख ७८७ खातेदार शेतकरी हे सोयाबीन व कापूस उत्पादक होते. त्यानुसार त्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागाने एकूण ४१९४ कोटी रुपये इतका निधी डीबीटी प्रणालीवर उपलब्ध करून दिलेला आहे. त्यापैकी १५४८ कोटी ३४ लक्ष रुपये कापूस तर सोयाबीन साठी २६४६ कोटी ३४ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.अनुदान स्वतंत्ररीत्या वितरण करण्यासाठी लेखाशीर्षासह महाआयटी द्वारे स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले होते. त्यावर शेतकऱ्यांची स्वतःचे संमती पत्र व बँक खाते आधार इत्यादी माहिती जमा करून ती माहिती जुळणे आवश्यक असल्याने यामध्ये काही कालावधी लागला.

# पालकमंत्री मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांना मिळणार पिकविम्याचे उर्वरित ५८.९४ कोटी रुपये

## मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी; ३१ हजार ९६८ शेतकऱ्यांना दिलासा

## मंत्री मुनगंटीवार यांनी कृषीमंत्र्यांची भेट घेऊन मांडला होता मुद्दा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांना पिकविम्याची उर्वरित रक्कम मिळण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. यात चंद्रपूर जिल्ह्यातील ३१ हजार ९६८ शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने मंत्रीमंडळाच्या बैठकीत पिकविम्याची उर्वरित रक्कम तातडीने देण्यासाठी मंजुरी दिली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील ३१ हजार ९६८ शेतकऱ्यांना उर्वरित ५८.९४ कोटी रुपये मिळणार आहेत.चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पंतप्रधान पिक विमा योजना खरीप हंगाम २०२३ ची उर्वरित रक्कम मिळण्यासाठी मंत्री श्री. मुनगंटीवार सातत्याने पाठपुरावा करीत होते. राज्यशासनाने अर्थसंकल्पामध्ये पीक विमा योजनेसाठी तरतूद करूनसुद्धा ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी, शेतकऱ्यांना नुकसानग्रस्त शेतीच्या विम्याची रक्कम देण्यास टाळाटाळ करीत होती. याबाबत शेतकऱ्यांच्या अनेक तक्रारी होत्या. या तक्रारींची दखल घेऊन चंद्रपूर येथे दोन बैठका तर मुंबई येथे कृषीमंत्री आणि सचिवांच्या उपस्थितीत तातडीने बैठक घेण्यात आली. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांचा पीक विम्याचा प्रश्न निकाली निघाला होता. त्यानंतर १४३.८१ कोटी रुपये पिक विमा रकमेचे वाटप झाले. पण ३१ हजार ९६८ शेतकऱ्यांचे ५८.९४ कोटी रुपये प्रलंबित होते.मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भात पाठपुरावा केला. राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे पत्रव्यवहार केला. त्यांच्याशी संवाद साधला आणि परिस्थिती सांगितली. शेतकऱ्यांना उर्वरित रक्कम मिळाली तरच शेतीचे पुढचे नियोजन करणे शक्य होईल. शिवाय सणासुदीच्या दिवसांमध्ये शेतकऱ्यांना आधार होईल, अशी भावना श्री. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली होती. ओरीएंटल इन्शुरन्स कंपनीला विमा हफ्त्याचा राज्य व केंद्र सरकारचा हिस्सा मिळालेला नाही. त्यामुळे जिल्हयातील उर्वरीत शेतकऱ्यांची पिक विमा नुकसान भरपाई प्रलंबित असल्याचे विमा कंपनीमार्फत कळविण्यात आले आहे. ही बाब देखील पालकमंत्र्यांनी निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर उर्वरित शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम लवकरच मिळण्याचा मार्ग त्यामुळे मार्ग सुकर झाला होता. पण उर्वरित रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नव्हती.

सोमवारी मंत्रीमंडळाच्या बैठकीत यासंदर्भात आवर्जून चर्चा झाली. मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी हा विषय पुन्हा एकदा लावून धरला. अखेर चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे पैसे तातडीने देण्यास मंत्रीमंडळाने मंजुरी दिली.

पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांचे मानले आभारपाऊस आणि अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे मोठा दिलासा मिळाला होता. त्यानंतर पिक विम्याच्या रकमेसाठी आणि आता उर्वरित रकमेसाठी देखील ना. मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला. प्रत्येकवेळी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील असलेल्या पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे शेतकऱ्यांनी आभार मानले आहेत.

# संगत कशी असावी?

**संगत कशी असावी? तर ती आपल्याला आनंद देणारी असावी. आपला मान राखणारी असावी आपली प्रतिष्ठा कायम ठेवणारी असावी. नवीन अनुभव देणारी असावी. सकारात्मक विचार देणारी असावी. आपल्याला दुःख किंवा कष्ट न देणारी अशी असावी. मुख्य म्हणजे संगत अशी असावी की, ज्यांच्या सहवासामुळे आपण अडचणीत येणार नाही. आपल्या आयुष्याचे करिअर घडवितांना शाळा, महाविद्यालय, नोकरी येथेही आपण संगत निवडत नाही तर ती स्वतःहून आपल्यापर्यंत येते. परंतु अशा ठिकाणी आपण आपल्यावर वाईट वृत्तीचे सहकारी प्रभाव टाकणार नाही याची काळजी घ्यायला पाहिजे. तो प्रभाव स्वीकारणे किंवा नाकारणे हा सर्वस्वी आपला निर्णय आहे.**



फेरफटका

डॉ.यशवंत घुमे
मो.९८२२२३३९१२
sahyandrinews@gmail.com



आज बऱ्याच वर्षानंतर म्हणजे साधारणतः ३५ वर्षानंतर माझा पदवी वर्गातील वर्गमित्र इंद्रदास आमने फोनवर बराचवेळ बोलला. इंद्रदास आणि मी आनंदवनात बीए पर्यंत एकत्रच शिकलो आता तो गावाकडे शेती करतो. इकडल्या तिकडल्या अघळपघळ गप्पा सुरू झाल्या. कोण काय करतो? कोण कुठे राहतो? कुणाचं कसं चाललंय? अशा आम्ही वर्गातील इतर मित्रमंडळीं संदर्भात परस्परात चौकशा सुरू केल्या. इतक्यात आमच्या मैत्रीमध्ये मिठाचा खडा

टाकणाऱ्या एका दुसऱ्या मित्राची आठवण झाली. त्याच्या संगतीचा दुष्परिणाम आपल्या भावी जीवनावर कसा झाला ही चर्चा सुरू झाली.त्याच्या नावावरून आयुष्यात संगत कशी महत्त्वाची असते या विषयावर मंथन सुरू केले. खरं म्हणजे आम्ही पदवीच्या वर्गामध्ये एकत्र होतो. हा पस्तीस वर्षांपूर्वीचा भूतकाळ होता. तरीही त्याही काळातील मैत्री या विषयावर आज इतक्या वर्षानंतर आमच्यात गांभीर्याने चर्चा झाली. आयुष्यात मैत्री महत्त्वाची कशी आहे त्यावर दोघेही मनमुराद बोललो. मराठीमध्ये एक म्हण आहे. सुसंगती सदा घडो,सृजन वाक्य कानी पडो माणसाच्या आयुष्याचं सोनं व्हायचं की राख व्हायची हे संपूर्णतः ती व्यक्ती कोणत्या प्रवृत्तीच्या लोकांच्या सहवासात राहते यावर अवलंबून आहे. आपल्या आयुष्याला जर योग्य वळण द्यायचं असेल तर नेहमी आपल्यापेक्षा उच्च विचारसरणीच्या, परोपकारी लोकांच्या सहवासातच राहिले पाहिजे. एकदा आपली संगत बिघडली की त्यातील गुणदोष न कळल्यामुळे आयुष्याचे गणित बिघडत जाते. मित्रासोबत वाहवत गेल्यामुळे आयुष्याचे समीकरण बिघडते. आणि हातात उरतो तो केवळ पश्चात्ताप मित्र जर चांगले असले तर नेहमीच त्याचे फळ आणि भविष्य चांगलेच मिळते. शेवटी वेळ निघून गेल्यावर पश्चाताप करण्यात काहीही अर्थ नाही. ज्या काळात आयुष्य घडविण्याची संधी असते त्या काळात ही पथ्ये पाळायला पाहिजे. ज्यांच्याशी आपण संगत करतो त्याचे गुणधर्म आपल्याला येऊन चिकटतात. हातात कोळसा पकडला तर तो हात काळेच करणार आणि चंदनाची काडी पकडली व गुलाब पकडला तर ते सुगंधच देणार हे ठरलेलंच आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास असे.

महाभारताची कथा सगळ्यांना माहिती आहे. त्यातील कर्ण हे पात्र आठवा. कर्ण हा शूर योद्धा होता. पराक्रमी होता. शूरवीर होता. भल्याभल्यांना हरविण्याची त्याच्यात क्षमता होती. सगळे त्याला शूरवीर म्हणून घाबरायचे. पंचक्रोशीत एक यशस्वी योद्धा म्हणून त्याचा दबदबा होता. परंतु

महाभारतातील कथा लक्षात घेता आपल्याला कळते की कर्णाची फजिती झाली. का झाली? कारण कर्णाने संगत निवडली दुर्योधनाची. अर्जुनाने संगत निवडली ती श्रीकृष्णाची. श्रीकृष्णाच्या संगतीमुळे अर्जुन महाभारतात तरला. आणि दुर्योधनाच्या संगतीमुळे कर्ण हरला. म्हणून आयुष्यात संगत महत्त्वाची आहे. तुमची संगत कुणाची आहे. तुमचे सल्लागार कोण आहे. तुमचे मित्र कोण आहे. हे आयुष्यात यशस्वी होण्याचे महत्त्वाचे सूत्र आहे. आपले मित्र जर सुविचारी असतील, परोपकारी असतील, चांगला विचार करणारे असतील, मेहनती व परिश्रम करणारे असतील, अभ्यासू असतील तर निश्चितच अर्जुनाप्रमाणे

आपली प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही. विजय झाल्याशिवाय राहणार नाही. आणि आपले मित्र जर कुविचारी असतील. वाईट विचाराचे असतील, स्वार्थी लोभी लबाड असतील तर निश्चितच कर्णाप्रमाणे आपली परिस्थिती होईल. म्हणून आयुष्यात संगत करताना ती कोणाशी करायची याचा निश्चितपणे विचार केला पाहिजे.

एक दूसरी गोष्ट सांगत्तो. दोन मित्र होते. बालपणी दोघेही मिळून एकत्र असायचे. एकत्र जेवायचे,फिरायचे. एकेदिवशी दोघांनी मिळून चोरी केली. दोघेही आपापल्या घरी चोरीचा माल घेऊन गेले.एका मित्राच्या आईने तो चोरीचा माल बघून कोणत्याही प्रकारची चौकशी न करता घरी ठेवून घेतला. मुलाचे कौतुक केले. शाबासकी दिली. दुसऱ्या मित्राच्या आईने तो माल कुठून आणला चौकशी केली. चोरीचा आहे असे कळताच त्याला दोन थोबाडीत ठेवून दिल्या. रागावत तो माल घरी ठेवण्यास मनाई केली ज्याचा त्याला परत करायला लावला. यापुढे असा वागलास तर घरात ठेवणार नाही अशी तंबी दिली. पहिला मित्र चोर झाला.पुढे चोऱ्या करण्याचा व्यवसाय करत राहिला. आणि ज्याच्या आईने थोबाडीत मारली होती तो सद्गृहस्थ झाला, त्यांने आयुष्यात चोरीचा मार्ग सोडून दिला. काही वर्षांनी चोरीची सवय जडलेला मित्र तुरुंगात गेला. मित्र तुरुंगात गेल्याचे दुसऱ्या मित्राला कळले. तो त्याला भेटायला जेलमध्ये पोहोचला. तेव्हा त्याने विचारले. मित्रा आता तुला कसं वाटतंय? तुरुंगात असलेला मित्र म्हणाला. मित्रा मला माझ्या बालपणी तुझ्या आईसारखी आई मिळाली असती तर आज माझ्यावर अशी तुरुंगात जायची पाळी आली नसती.

मित्रहो आयुष्यामध्ये संगतीचा विचार करत असताना संगती दोन प्रकारची असते. एक कौटुंबिक परिवाराची आणि दूसरी कुटुंबाबाहेरील लोकांची. या दोन्हीही संगती योग्य व व्यवस्थित असेल तर आयुष्याला नक्कीच दिशा मिळेल, आकार मिळेल, संस्कार मिळेल. आणि ती जर चुकीची असेल तर त्याचे दुष्परिणाम चुकीचे संस्कार झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून आईने तरी आपले मूल घराबाहेर गेल्यानंतर काय करते? ते कोणाशी भेटते? त्याची मैत्री कोणाकोणाशी आहे? त्याचे मित्र कुठल्या विचाराचे आहे, कुठल्या स्वभावाचे आहे? यावर पाळत ठेवायला पाहिजे. मूल चुकीच्या मित्रांच्या सहवासात राहत असेल तर त्याला लगेच फटकारले पाहिजे. जर त्यावेळी दुर्लक्ष केले तर मुलाच्या आयुष्याची दिशा बिघडल्याशिवाय राहणार नाही.

### जागतिक रक्तदान शिबीरानिमित्त घेण्यात येणाऱ्या

## रक्तदान शिबीरात युवकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हा-अनिल जाधव

**मानवत । प्रतिनिधी**

एक ऑक्टोबर जागतिक रक्तदान दिना निमित्त दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी मानवत शहरातील खंडोबा मंदिर मित्र मंडळ यांच्या वतीने परभणी जिल्ह्यातिल रक्त तुटवडा व रुग्णांची होणारी गैरसोय या कारणा स्तव व सामाजिक बांधिलकी म्हणून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे या *या रक्तदान शिबिरात नवयूवकांनी मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय कार्यात देशसेवेसाठी सहभाग नोंदवावा असे आवाहन शिवसेनेचे शहरप्रमूख अनिल जाधव यांनी केले आहे. या वेळी शिबिराचे उद्घाटन श्री.डॉ.नागेश लखमावार जिल्हा शैल्य चिकित्सक परभणी, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री पांडुरंग माचेवाड तहसीलदार मानवत, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संदीप



बोरकर सहाय्यक पोलीस निरीक्षक मानवत, कार्यक्रमाची प्रमुख उपस्थिती सौ.कोमल सावरे नगरपरिषद मानवत मुख्य प्रशासक व मुख्य अधिकारी यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आसून या शिबिरामध्ये ओम भगवती मित्र मंडळ , श्री संत सावता माळी मित्र मंडळ , रामनगर मित्र मंडळ , मॉर्निंग बॉईज ग्रुप , आदिशक्ती मित्र मंडळ , मृत्युंजय प्रतिष्ठान , शिव मित्र मंडळ , आर्ट ऑफ लिविंग परिवार , मोरेश्वर मित्र मंडळ , जय अंबे ग्रुप , शिवनेरी मित्र मंडळ ,राजपूत मित्र मंडळ , माय लाईफस्टाईल परिवार , व खंडोबा मित्र मंडळ मानवत या सर्व मित्र मंडळाचे सदस्य या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान करणार आहेत या रक्तदान शिबिरामध्ये मानवत तालुक्यासह शहरातील जास्तीत जास्त युवकांनी सहभागी व्हावे असे आव्हान अनिल जाधव , पांडुरंग जाधव यांच्यासह सर्व खंडोबा मंदिर मित्र मंडळाच्या सदस्यांनी केले आहे.

## सेलूत तालुक्यातील कीर्तनकार व कथाकारांचा भव्य सत्कार

### माजी आमदार विजयराव भांबळे यांचा पुढाकार

**सेलू । सतिष आकात**

तालुक्यातील किर्तनकार व कथाकार तसेच बाल किर्तनकारांचा भव्य सत्कार सोहळा माजी आमदार विजयराव भांबळे यांच्या वतीने पार पडला . गुरूवार २६ सप्टेंबर रोजी शहरातील टिळक पुतळा परिसरातील मैदानात सायंकाळी ५ ते ७ यावेळेत वारकरी संप्रदायामध्ये उल्लेखनीय कार्य करत समाज प्रबोधन करून समाजाचे हित जोपासणाऱ्या तालुक्यातील कीर्तनकार व कथाकार यांच्या सोबतच बाल किर्तनकारांचा देखील यावेळी सन्मान करण्यात आला . यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पंढरीच्या पांडुरंगाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . यावेळी माजी आमदार ,विजयराव भांबळे ,माजी अर्थ व



बांधकाम सभापती अशोकराव काकडे , प्रेक्षाताई भांबळे ,माऊलीच्या दिंडीतील मानकरी पुरुषोत्तम महाराज वालूरकर ,दत्तराव महाराज सोनेकर ,जयराम महाराज तांगडे ,प्रसाद महाराज काष्टे राजेंद्र लहाने ,नामदेव डख ,प्रकाशराव मुळे ,सुधाकरराव रोकडे ,पप्पू गाडेकर ,पुरुषोत्तम पावडे ,रघुनाथ बागल आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती . यावेळी माजी आमदार विजयराव भांबळे यांच्या हस्ते तालुक्यातील ११० कीर्तनकारांना शाल श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष मोहकरे यांनी केले .

### आरपीआयची भाजपकडे १२ जागांची मागणी

## रामदास आठवलेंचे बावनकुळेंना पत्र मुंबईतील जागांवरही केला दावा

**नागपूर (वृत्तसंस्था)**
आगामी विधानसभा निवडणुकीत आरपीआयला १२ जागा देण्यात याव्यात, अशी मागणी आरपीयआयचे नेते आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी भाजपकडे केली आहे. यासंदर्भात आठवले यांनी भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना एक पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी मुंबईतील काही जागांवर देखील दावा केला आहे.
रामदास आठवले यांनी काही दिवसांपूर्वी आम्हाला किमान १०-१२ जागांवर निवडणूक लढवण्याची संधी दिली पाहिजे, असे वक्तव्य केले होते. तसेच विदर्भातील तीन ते चार जागा मागणार असल्याचे त्यांनी सांगितले होते.
आरपीआयचे नेते रामदार आठवले यांनी पत्रकार परिषद घेत जागावाटपावर आपले म्हणणे मांडले आहे. राष्ट्रवादी आणि शिवसेनेप्रमाणेच आरपीआयला देखील दोन महामंडळे द्यावीत. तसेच विधान परिषदेच्या १२ आमदारांमध्ये एक जागा आम्हाला मिळावी. यासोबतच विधानसभा निवडणुकीसाठी नांदेड, कोल्हापूर, वाशिम आणि मुंबईतील मालाड, धारावी यांसारख्या जागा आम्ही मागितल्या आहेत, असे आठवले यांनी सांगितले.
रामदास आठवले म्हणाले की, आमच्या पक्षाला विधानसभा निवडणुकीत १२ जागा द्याव्यात, अशी मागणी आम्ही केली आहे. माझी २०२४ ची लोकसभा निवडणूक लढवण्याची इच्छा होती. पण मी लढलो नाही. जागा न घेता सर्वत्र महायुतीचा प्रचार केला. मात्र विरोधकांनी संविधान बदलतील असा अप्रचार करून निवडणुकीत यश मिळवले. यावेळी मात्र तसे होणार नाही, असे रामदास आठवले म्हणाले.
३ ऑक्टोबर रोजी आरपीआयचा ६७ वा वर्धापन दिन आहे. सातारा येथे पक्षाचा वर्धापन सोहळा साजरा होणार आहे. या सोहळ्यात उदयनराजे आणि शिवेंद्रराजे यांचीही उपस्थिती असणार आहे.दरम्यान, विधानसभेच्या २८८ जागांवर भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार गट), शिवसेना (शिंदे गट) आणि आरपीआय एकत्र लढणार आहेत. मात्र अद्यापपर्यंत महायुतीमध्ये जागा वाटपांचा निर्णय झाला नसून तिकीट वाटपावर चर्चा सुरू आहे. अशात रामदास आठवले यांची मुंबईती जागांसह १२ जागांची मागणी भाजप मान्य करणार की नाही, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.



# सोलापूर जिल्हा काँग्रेस (इंटक) ची कार्यकारणी बैठक व पदाधिकाऱ्यांची निवडी संपन्न

**सोलापूर | प्रतिनिधी**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या इंटक (इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस) सोलापूर जिल्हा कार्यकारिणीची बैठक व पदाधिकाऱ्यांच्या निवडी २९ सप्टेंबर, रविवार रोजी दुपारी १२:३० वाजता शासकीय विश्रामगृह, करमाळा येथे पार पडल्या. या बैठकीत जिल्हा उपाध्यक्षपदी शिवाजी सेनसाखळे, सचिव नवनाथ दत्तात्रय काळे, सहसचिव अविनाश किसन मोरे, कोषाध्यक्ष सिद्दाराम भीमराव कोळी, संघटक शंकर शिवयोगी लोभे यांची निवड करण्यात आली. महिला कामगार अध्यक्षपदी सुजाता राजकुमार वाघमारे, उपाध्यक्ष मंगल लहूदास वाघमारे यांची नियुक्ती झाली. तसेच मीडिया प्रमुख म्हणून राजू तैमूर सय्यद, सोशल मीडिया प्रमुख अजीम शेख फरीद शेख, युवा जिल्हाध्यक्ष नागसेन ज्ञानदेव डूरके यांची निवड झाली. सदस्य म्हणून अविनाश दिलीप वाघमारे, चंद्रकांत नारायण कांबळे, संजय येताळ अवचर, भीमराव माणिकराव नाळे यांचा समावेश करण्यात आला.

यावेळी करमाळा बांधकाम कामगार शहराध्यक्षपदी चेतन जयराज आव्हाड आणि उपाध्यक्षपदी संजय रामचंद्र कुकडे यांची निवड झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष अमोल जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बाबासाहेब चव्हाण, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रवींद्र जगताप, महिला सेल महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष अनिताताई गोरे, पश्चिम महाराष्ट्र महिला आघाडी अध्यक्ष प्रज्ञाताई कांबळे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर लोभे यांनी केले.बाबासाहेब चव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शनात काँग्रेस इंटकचे महत्त्व व त्याचे धोरणे स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, सोलापूर जिल्ह्यात गेल्या दहा वर्षांत काँग्रेस इंटकची फारशी ओळख नव्हती, परंतु अमोल जाधव यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण जिल्ह्यात एका महिन्याच्या काळात संघटन मजबुतीसाठी मोठे प्रयत्न करण्यात आले आहेत.अनिताताई गोरे व प्रज्ञाताई कांबळे यांनी महिलांना स्वावलंबी होण्यासाठी प्रेरित करत म्हणाले की, महिलांनी इतरांच्या हाताखाली काम करण्याऐवजी स्वतःच्या व्यवसायाच्या संधी निर्माण कराव्यात, आणि काँग्रेस इंटकच्या माध्यमातून आम्ही त्यांना सर्वतोपरी मदत करू.या कार्यक्रमाला आप्पा कांबळे, विक्रम साळवे, बंटी पवार, कुणाल चवरे, दत्तात्रय आलाट, अजिनाथ आलाट, भाऊसाहेब भोसले, हर्षद गुळवे, राजाभाऊ मोहोळकर, आदित्य जाधव, रोहन परदेशी, अनिकेत कांबळे, मनोज ताकतोडे, तन्मय भिताडे, गणेश झिंजाडे, राज शेख, संतोष गोरे, पिंटू मोरे, नागेश चव्हाण, विजय गायकवाड, सार्थक उबाळे, नागेश पवार यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.




# नवभारत विद्यालय मुल येथे शासकीय रेखा कला परीक्षा संपन्न

**मूल | प्रतिनिधी**

दि. २५ सप्टेंबर २०२४ ते २८ सप्टेंबर २०२४ या कालावधीत नवभारत विद्यालय, मूल केंद्र क्रमांक ११९००४ येथे एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत मूल, पोंभूर्णा आणि सावली तालुक्यातील एकूण ७०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या परीक्षेचे केंद्रप्रमुख म्हणून ए.एच. झाडे, मुख्याध्यापक आणि प्राचार्य, नवभारत विद्यालय, मूल यांची निवड करण्यात आली. सहायक केंद्र प्रमुख म्हणून भारत सलाम, कलाशिक्षक, नवभारत विद्यालय, मुल, तसेच सहभागी शाळेतील कलाशिक्षक आणि शिक्षक, रवींद्र फडतरे, कार्तिक नंदुरकर, लालजी बावणे, योगेश पेंटेवार, ऊराडे, देवानंद रामटेके, घनश्याम मेश्राम, प्रणित नमुलवार, रविना धोटे, सरस्वती गणवीर, भोयर, चैताली बावने यांच्यासह इतरांनी परीक्षेचे पर्यवेक्षण सुव्यवस्थितपणे पार पाडले.तीन दिवस चाललेल्या एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट परीक्षेमध्ये डिझाईन, स्मरण चित्र, स्थिरचित्र, संकल्प चित्र, रेखाचित्र, भूमिती आणि अक्षरलेखन असे चार पेपर घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट चित्रे तयार केली.



# नागभीडमध्ये तहसील रोडवर ऐटीत चालणारे बदक जोडपे;नागरिकांसाठी आकर्षण



**नागभीड | प्रतिनिधी**

तहसील रोडवर एक दृष्य अगदी मनोवेधक होते. बदकांचे जोडपे आपल्या खास ऐटीत आणि दिमाखदार पद्धतीने रस्त्यावर चालताना दिसले. या दृश्याने रस्त्यावरून जाणारे नागरिक मंत्रमुग्ध झाले. छायाचित्रकार प्रणय बांगरे यांनी या मनोहारी क्षणाचे सुंदर छायाचित्र टिपले आहे, जे आता चर्चेचा विषय बनले आहे.

## एमपीएससीत यशस्वी विनायक अकोलकर यांचा सत्कार

# माजी आमदार भाऊसाहेब तात्या चिकटगावकर यांच्या हस्ते सत्कार; लाडगावमधील भूमिपुत्राचं यश

**वैजापूर | अर्जुन शिंदे**

तालुक्यातील लाडगाव येथील भूमिपुत्र विनायक दत्तात्रय अकोलकर यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) अन्न व नागरी पुरवठा विभागांतर्गत वैद्यमापनशास्त्र निरीक्षक पदी निवड झाली आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत वाढलेल्या विनायकने जिद्दीने अभ्यास करत हे यश संपादन केले. माजी आमदार भाऊसाहेब तात्या चिकटगावकर यांच्या हस्ते विनायकचा सत्कार करण्यात आला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

विनायक अकोलकर हे भूमिहीन कुटुंबातील असून, त्यांच्या आईवडिलांनी शिलाई काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. लाडगाव जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक शिक्षण घेऊन, नंतर अभियंत्रिकी पूर्ण करणाऱ्या विनायकने अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. कोणत्याही कोचिंगशिवाय, मागील चार वर्षे मेहनत घेत त्यांनी स्पर्धा परीक्षेत यश मिळवले. त्यांची दोन थोरल्या बहिणी असून, या यशामुळे संपूर्ण कुटुंबाच्या मेहनतीचे चीज झाले आहे.

लाडगावच्या या भूमिपुत्राने मिळवलेल्या यशामुळे वैजापूर तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. सत्काराच्या वेळी तात्या चिकटगावकर यांनी विनायकच्या कर्तृत्वाचे कौतुक करत, त्यांच्या यशाला सलाम केला आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विनायकच्या मित्रपरिवारासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




# दलित वस्तीत निकृष्ट दर्जाच्या रोड बांधकामाचा वंचित बहुजन आघाडीने केला निषेध

## निकृष्ट साहित्य वापराचा आरोप; नगर परिषदेला जनआंदोलनाचा इशारा

**पुलगाव | प्रतिनिधी**

तेलघानी फैल ते आठवडी बाजार पर्यंत दलित वस्तीतून होणाऱ्या सिमेंट कॉंक्रिट रोडच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाविरोधात वंचित बहुजन आघाडीने नगर परिषदेला निवेदन सादर केले आहे. या बांधकामात ठेकेदार निकृष्ट साहित्य वापरत असल्याचा आरोप करण्यात आला असून, लवकरात लवकर हे बांधकाम बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे.

वंचित बहुजन आघाडीने दोन दिवसांत बांधकाम बंद न केल्यास जनआंदोलन उभारून काम थांबवण्याचा इशारा दिला आहे. बांधकाम बंद पडल्यामुळे कोणतीही जनहानी किंवा नुकसान झाल्यास, त्याची जबाबदारी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यावर असेल, असा इशारा दिला आहे. निवेदनाद्वारे दलित वस्तीत लाखोच्या निधीतून होत असलेल्या रोडच्या निकृष्ट बांधकामावर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. जर नगर प्रशासनाने कारवाई केली नाही तर भ्रष्टाचाराचा खुलासा करून आंदोलन उभारण्यात येईल, असे वंचित बहुजन आघाडीने ठामपणे सांगितले आहे.निवेदन सादर करण्याच्या वेळी जिल्हा नेते रवि खडसे, ज्येष्ठ नेते डॉ. नितीन चव्हाण, ज्येष्ठ नेते देवानंद येसनकर, युवा नेते अमोल कोल्हे, जिल्हा सचिव दादाराव वाघमारे, पुलगाव शहर उपाध्यक्ष पद्माकर अंबाडे, अशोक रामटेके, भीमराव तिरपुडे, हिरालाल रामटेके, व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# शहीद भगतसिंग यांची जयंती साजरी

## शहीदांचा बलिदान आणि वंदन



**पुलगाव | प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले अमूल्य बलिदान देताना शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना फाशी देण्यात आली. या हुतात्म्यांना संपूर्ण देश वंदन करतो. त्यांच्या ११७ व्या जयंतीनिमित्त भगतसिंग चौकात वंदन करण्यात आले.यावेळी शहीद भगतसिंग यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला, आणि शहीद भगतसिंग अमर रहेच्या घोषणा देण्यात आल्या. या कार्यक्रमात माजी शहराध्यक्ष मनीषकुमार साहू, गजानन पचारे, नीरज ढगे, अमित ददगल, हिरालाल साहू, आकाश राऊत, राजेश गवई, अनमोल साहू आदींनी पुष्पाजली अर्पण केली. शहीदांच्या कार्यामुळे युवा पीढी प्रेरित होत आहे आणि त्यांच्या विचारांना उजाळा देण्यात येत आहे.

## पुलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची सर्वसाधारण सभा संपन्न

# आमदार रणजित कांबळे आणि काँग्रेस अध्यक्ष मनोज चांदूरकर यांचा सत्कार

**पुलगाव | प्रतिनिधी**

पुलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची सर्वसाधारण सभा दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता पंचधारा रोडवरील बाजार समितीच्या कार्यालयात पार पडली. या सभेत मागील सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यात आले आणि २०२३-२४ च्या वार्षिक अहवालाची माहिती देण्यात आली. आर्थिक प्रत्रक, आवक-जावक, नफा-तोटा याचाही आढावा सादर करण्यात आला.या सभेच्या अध्यक्षस्थानी सभापती मनोज वसू होते. आमदार रणजित कांबळे आणि वर्धा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मनोज चांदूरकर यांचा सत्कार पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. आमदार कांबळे आणि सभापती वसू यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले.सभेला उपसभापती संजय कामनापुरे, अरविंद वानखेडे, संजय बोबडे, प्रमोद वंजारी, मनीष खडसे आणि अन्य संचालक, सदस्य आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेत कापूस यार्ड सुरू करण्याबाबत चर्चा झाली, तसेच कापसाच्या भावाबाबत शेतकऱ्यांनी प्रश्न उपस्थित केले. यावर सभापती वसू यांनी मालाला योग्य भाव मिळेल याची हमी दिली आणि यावर्षी यार्डमध्ये कापूस खरेदी सुरू होईल असे आश्वासन दिले.गुजंखेडा सोसायटी सदस्यांनी शेतकऱ्यांना चेक मिळाल्यानंतर पैसे देण्यासाठी ८ दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याची समस्या मांडली, यावर सभापतींनी २४ तासांत पैसे मिळतील असे आश्वासन दिले. आभार प्रदर्शन उपसभापती संजय कामनापुरे यांनी केले, आणि शेवटी सर्व सदस्य आणि शेतकऱ्यांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती.




# श्री मकाई सहकारी साखर कारखान्याची २५वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

**सोलापूर | प्रतिनिधी**

श्री मकाई सहकारी साखर कारखान्याची २५वी वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत खेळीमेळीत व शांततेच्या वातावरणात पार पडली. भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा व साखर संघाच्या संचालिका रश्मी बागल यांच्या उपस्थितीत ही सभा पार पडली. या प्रसंगी त्यांनी कारखान्याच्या प्रगतीसाठी कुटुंबाच्या संपत्तीला गहाण ठेवण्याची तयारी दाखवली असल्याचे सांगत कारखान्याच्या संवर्धनाची जबाबदारी प्रत्येक सभासदाची असल्याचेही स्पष्ट केले.रश्मी बागल यांनी लोकनेते दिवंगत दिगंबरराव बागल मामा यांनी संस्थेला दिलेली परंपरा आणि वारसा जतन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी म्हटले की, मकाई हा सभासदांचा कारखाना असून, आम्ही केवळ विश्वस्ताच्या भूमिकेत आहोत. कारखान्याच्या पुनर्वैभवासाठी आपणा सर्वांच्या सहकार्याने काम करण्याची आम्ही प्रतिज्ञा करतो.सभेमध्ये सर्व ठराव सभासदांच्या एकमुखी मंजुरीने पारित झाले. यावेळी संस्थेचे चेअरमन दिनेश दादा भांडवलकर यांनी विषय वाचन केले. या सभेच्या प्रारंभी दिवंगत दिगंबरराव बागल मामांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. सभेत भाजपा सोलापूर जिल्हा युवा नेते आणि माजी चेअरमन दिग्विजय बागल यांची जिल्हा नियोजन समितीवर नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव संचालक सतीश निळ यांनी मांडला. या ठरावाला पोथरे येथील हरिश्चंद्र झिंजाडे यांनी अनुमोदन दिले व सभासदांनी टाळ्यांच्या गजरात ठराव मंजूर केला.सभेत कामगारांची देणी, तोडणी वाहतूकदार आणि सभासदांच्या हितास प्राधान्य देण्याचे आश्वासन देण्यात आले. कारखान्याचे भविष्यातील उद्दिष्ट पुनर्वैभव प्राप्त करणे असल्याचेही सभेत सांगण्यात आले.सभेसाठी प्रमुख पाहुणे केरू गव्हाणे, संचालक बाळासाहेब पांढरे, चेअरमन धनंजय डोंगरे, संचालक सतीश निळ, युवराज रोकडे, रेवननाथ निकत, गणेश झोळ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.सभेचे सूत्रसंचालन रश्मी बागल यांच्या स्वीय सहाय्यक शेखर जोगळेकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन संचालक कल्याण सरडे यांनी केले.



# श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्टचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**अमरावती । प्रतिनिधी**

श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्ट, किरण नगर अमरावती या संस्थेचा वर्धापन दिन सोहळा नुकताच श्रीराम पंचायतन मंदिर परिसरात उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी कांचन नितीन गडकरी व डॉ. मालासिंह ठाकूर, इंदौर (मध्य प्रदेश) ह्या विशेष वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.

या वर्धापन दिनानिमित्त राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून उच्चविद्याविभूषित, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या सुप्रसिध्द वक्त्या

डॉ. माला सिंह ठाकूर ह्यांचे लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन कार्याची माहिती देताना त्या म्हणाल्या की,



अहिल्यादेवी राजमाता न बनता त्या लोकमाता बनल्या हे संपूर्ण भारतामध्ये एक आदर्शवत स्त्री कशी असावी ? याचे उत्तम उदाहरण म्हणजे अहिल्यादेवी. सद्यस्थितीतील जीवन कार्यामध्ये स्त्रियांनी त्यांच्या आदर्शाचा उपयोग नवीन पिढी घडवितांना करावा. अहिल्यादेवी यांनी स्त्रियांना व्यवसायभिमुख प्रशिक्षण दिले. त्यांनी आजच्या कौशल्यपूर्ण शिक्षणाबद्दलची मुहूर्तमेढ आपल्या काळात रोवली होती. उन्नत भारताचा आलेख चढता राहील असा उल्लेख प्रतिपादित केला. सर्व जाती-धर्म-पंथ हे समान आहे. सर्वांना समानतेची वागणूक आपल्या आचरणातून दिली. त्यांचा महालाचा दरवाजा नेहमी सर्वांसाठी खुला असायचा त्यामुळे राजमाता ऐवजी त्या लोकमाता म्हणून ओळखल्या जात होत्या. युद्ध निती असो वा धर्म निती त्यांनी दोन्ही नीतीचा उपयोग त्यांनी आपल्या चातुर्याने केला. असे डॉ. माला सिंह ठाकूर यांनी त्यांच्या ओजस्वी वाणीतून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारे व्याख्यान दिले. मुलांची पहिली गुरु आई व त्यानंतर शिक्षक असतात. आई व शिक्षकांनी मुलांवर चांगले संस्कार करावे जेणे करून संस्कारक्षम पिढी घडेल. शिक्षण संस्था माणूस घडविण्याचे केंद्र आहे. या केंद्रातून उत्तमोत्तम विद्यार्थी घडेल यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आवाहन कांचन गडकरी यांनी केले.संस्थेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून संस्थेद्वारे समाजातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिला शक्तीचा गौरव व सत्कार सौ. गडकरी यांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये अपर्णा शास्त्री (धार्मिक क्षेत्र), डॉ. सरिता कडू (वैद्यकीय क्षेत्र), नीता कक्कड़, कुमुद महेंद्र (क्रीड़ा क्षेत्र), आशा बियानी (सेवा क्षेत्र), शोभा डवरे (बचत गट व कृषि क्षेत्र) यांचा समावेश होता. या वर्धापन दिन कार्यक्रमामध्ये अमरावती शहरातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या ३३ संघटनांनी तसेच गणमान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. य कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रशेखर भोंदू हे होते. संस्थेचे सचिव राम महाजन यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याची व भविष्यातील नियोजनाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन अनितातांई व्यवहारे यांनी व सत्कारमूर्तींचा परिचय डॉ. कुंजन वेद यांनी केले. आभार प्रदर्शन संस्थेचे उपाध्यक्ष रविभाऊ खांडेकर यांनी केले.या कार्यक्रमाला संस्थेचे कोषाध्यक्ष श्याम राठी, विश्वस्त श्रीकांत काळीकर, सुनील पाठक उपस्थित होते. तसेच सरस्वती शिशुवाटिका, सरस्वती विद्यामंदिर, श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हृदय दिनानिमित्त सेंट जॉन हायस्कूलची सायकल रॅली

## विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**पुलगाव । प्रतिनिधी**

आजच्या व्यस्त जीवनशैलीमुळे सध्याची पिढी आपल्या शारीरिक आरोग्याकडे दुर्लक्ष करत असल्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक यशबोध व ज्ञान प्रबोधिनी संचलित सेंट जॉन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने २९ सप्टेंबर २०२४ रोजी हृदय दिन साजरा करण्यात आला. हृदय दिनानिमित्त विद्यार्थ्यांची सायकल रॅली आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये मुलांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. ही रॅली स्टेशन चौक, टिळक नगर, गांधी चौक आणि नाचणगाव हायस्कूलपर्यंत घेण्यात आली. यावेळी उपमुख्याध्यापिका कु. आरती कुऱ्हझडकर आणि उपमुख्याध्यापक महेंद्र



भोयर यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य निरोगी ठेवण्याबाबत मार्गदर्शन केले. शिक्षकांमध्ये सतीश नाईक, वसंत उपाध्याय, दीपक फुसाटे, नीलेश ढवळे, संजय पाटील, ललित इंगळे, स्वाती इंगळकर, सिमा उपाध्याय, प्रीती गुप्ता, सुजाता शिरभाते, माधुरी चाणेकर, सुनीता ठोंबरे, शितल मुरळे, अरविंद मुरळे, पो. सीमा श्रीवास्तव, रेखा इंदूरकर, स्नेहा गंडाईत, आशिष तुरणकर, वानखडे आणि रितेश खंडागडे यांनी यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. ही रॅली विद्यार्थ्यांना आरोग्याबाबत जागरूक करण्यात महत्त्वपूर्ण ठरली.

# सेलू तालुक्यावर संभाव्य उमेदवारांचा जोर, भेटीगाठी वाढल्या; निवडणूक ज्वर चढू लागला

**सेलू । विजय माहुर**

सेलू तालुका, जो ग्रामीण भाग असला तरी येथे मतदार निर्णायक ठरले आहेत. यामुळे निवडणुकीच्या अगोदरच संभाव्य उमेदवारांनी मोर्चा बांधणी सुरू केली आहे. वर्धा विधानसभा क्षेत्रात सेलू तालुक्यातील अनेक गावांचा समावेश असून, सेलू नगरात दप्तरी गटाचा झेंडा आहे.

यामध्ये भाजपा आणि काँग्रेसची सत्ता असलेली अनेक ग्राम पंचायत आहेत, परंतु गेल्या काही महिन्यांपासून तालुक्यातील अर्ध्या अधिक ग्राम पंचायतवर प्रशासक राज असल्याने स्थानिक नेते कमी सक्रिय झाले आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत झालेल्या परिवर्तनामुळे काँग्रेसचा संभाव्य उमेदवार कोण असेल, याकडे लक्ष लागले आहे. काँग्रेसच्या शेखर शेंडे, डॉ. सचिन पावडे, डॉ. अभ्युदय मेघे, आणि सुधीर पांगुळ या उमेदवारांनी मतदारांशी भेटी घेतल्यानंतर काँग्रेसची उमेदवारी आपल्यालाच मिळेल, असे सांगितले आहे. त्यामुळे मतदारही सभ्रमात पडल्याचे चित्र आहे. यामुळे काँग्रेसच्या प्रचारामुळे वातावरण निर्माण होत आहे.याशिवाय, सेलू तालुक्यातील स्थानिक नेते रविंद्र कोटंबकरदेखील मैदानात उतरणार असल्याची चर्चा आहे. भाजपा विद्यमान आमदार पंकज भोयर यांना उमेदवारी देणार असल्याची माहिती मिळाली आहे, परंतु काँग्रेसची उमेदवारी कोणाला मिळणार याकडे तालुकावासीयांचे लक्ष लागले आहे.तालुक्याचा विकास, पांदन रस्ते, शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतमालाला भाव, बेकारीचा प्रश्न, आणि औद्योगिक वसाहत निर्मिती हे निवडणुकीचे प्रमुख मुद्दे असल्याचे दिसून येत आहे. गणेश उत्सवाच्या निमित्ताने संभाव्य उमेदवारांकडून होणारी हजेरी, तसेच गावागावात सुरू असलेल्या बैठका यामुळे निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच निवडणूक ज्वर चढू लागला आहे

# सहकाराच्या माध्यमातून विविध क्षेत्रात विकास शक्य - अविनाश भोपे




**पुलगाव । प्रतिनिधी**

सहकाराच्या माध्यमातून अर्थपुरवठा, समूह कार्य, शिस्त निर्माण करून विविध क्षेत्रांमध्ये विकास कार्य उभे करता येऊ शकतात. नागरी सहकारी पतसंस्था या कार्याचा पाया ठरू शकतात, असे प्रतिपादन मातृसेवा पतसंस्थेचे संस्थापक अविनाश भोपे यांनी केले.

स्थानिक मातृसेवा सभागृहात मातृसेवा नागरी सहकारी पतसंस्थेच्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना अविनाश भोपे पुढे म्हणाले, महिलांचे बचत गट, सुशिक्षित बेरोजगार, छोटे-मोठे उद्योग उभारू इच्छिणारे होतकरू तरुण यांना नागरी सहकारी पतसंस्थांनी आर्थिक मदत केल्यास महिला व होतकरू तरुण स्वतःच्या पायावर उभे राहू शकतील. त्यामुळे रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील. पतसंस्थांच्या ठेवी उभारणे, कर्जवाटप, कर्ज वसुली आणि आवश्यक कर्ज वाटप करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. अनेक गरजूंना योग्य वेळी आर्थिक मदत मिळाल्यामुळे त्यांचे स्वप्न साकार झाल्याचा आनंद अनुभवताना सहकाराच्या कार्याची माहिती पटते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन, माता लक्ष्मी व भारत मातेच्या पूजनाने झाली. देशासाठी शहीद झालेल्या वीरांना, आर्थिक वर्षात विविध क्षेत्रांमध्ये निधन पावलेले मान्यवर, आणि पतसंस्थेचे सभासद यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पतसंस्थेचे कर्मचारी प्रविण कपाट यांनी मागील सभेचे वृत्तवाचन केले, तर सचिन कासार यांनी वार्षिक कार्यवृत्त वाचन केले. मंचावर उपाध्यक्ष प्रदीप पराते, संचालक निळकंठ पुनवटकर, अमिन ओलिया, ओमप्रकाश वरघट, विजय भांडे, रंजना माळोदे, भारती मेश्राम, शिल्पा होले उपस्थित होते. आर्थिक पत्रकांना मंजुरी देण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन गजेंद्र गालपेल्लीवार यांनी केले, तर आभार दिनेश येडांगे यांनी मानले. विजय भांडे यांनी गायिलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.आमसभा यशस्वीतेसाठी व्यवस्थापक संजय दिघेकर, भिमानंद गवई, रवि केशरवानी, रविंद्र बाळापुरे, भुषण पुनवटकर, राजु दुर्गे, मंगेश बिरे, विलास दंतेवार, जगदीश गावंडे आणि प्रफुल मंथनवार यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता मेळावा एकजुटीने विकासासाठी पुढाकार

**तालुका । गंगाखेड**

उल्हासपूर्ण वातावरणात आयोजित केलेल्या कार्यकर्ता मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते एकत्र येऊन आगामी निवडणुकांसाठी रणनीती तयार करताना दिसले. ३० सप्टेंबर २०२४ रोजी श्री. राम मंदिर सभागृह, पूर्णा येथे पार पडलेल्या या मेळाव्यात पक्षाचे नेते आणि मान्यवर उपस्थित होते, ज्यात कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याची प्रेरणा देण्यात आली.



या मेळाव्यात पक्षाचे तालुकाध्यक्ष शहाजी साहेबराव देसाई, शहराध्यक्ष प्रतापराव कदम आणि युवक तालुकाध्यक्ष गजानन कदम यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी माजी जि. प. उपाध्यक्ष गोपीनाथराव तुडमे, पूर्णा शहराचे माजी नगराध्यक्ष शेख मुजीब, पालमचे नगराध्यक्ष वसंतराव सिरस्कर, तसेच अनेक प्रमुख व्यक्तिमत्त्वे उपस्थित होती. कार्यक्रमात विविध स्थानिक नेत्यांनी पक्षाच्या कार्याबद्दल आणि आगामी योजनांविषयी विचारले. त्यांनी कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याचे आणि जनतेच्या हितासाठी समर्पित राहण्याचे आवाहन केले. कार्यकर्ता मेळाव्यात सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामीण सरपंच, ग्राम पंचायत सदस्य, आणि सेवा सहकारी संस्थांचे चेअरमन व सदस्य उपस्थित होते. या मेळाव्यात एकत्र येऊन कार्यकर्त्यांनी आपली एकता दर्शवली आणि विकासासाठी एकत्र काम करण्याची शपथ घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी, उपस्थित सर्वांनी एकत्र येऊन राष्ट्रवादी काँग्रेसच्या विचारधारेच्या प्रचारात सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी या मेळाव्यातील एकजुटीच्या वातावरणात विकासासाठी योगदान देण्याचे ठरवले आहे.

# श्री.स.भु.बिडकीनच्या प्रचिता कळसकर हिची राज्यस्तरीय एकपात्री नाटक स्पर्धेसाठी निवड

**बिडकीन । प्रतिनिधी**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर आयोजित माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कला उत्सव स्पर्धेत पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथील प्रचिता बाबासाहेब कळसकर हिची राज्यस्तरीय एकपात्री नाटक स्पर्धेसाठी निवड झाली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हास्तरीय स्पर्धेत तिने आपली दर्जेदार आणि उत्कृष्ट कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सहा विविध कला प्रकारांमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून सतरा विद्यार्थ्यांची कला उत्सव राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्रचिता कळसकर एकपात्री नाटक सादर करणार आहे. या स्पर्धेसाठी तिला प्रशालेतील सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख श्रीमती मालती बिरारे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या यशाबद्दल संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य आणि समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ. मिलिंद कोनार्डे, शालेय समितीचे अध्यक्ष किसनलाल तोतला, मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, शालेय समितीचे ज्येष्ठ सदस्य मच्छिंद्र पाटील हाडे, नंदकुमार वैद्य, डॉ. अंताराम धरपळे, उपमुख्याध्यापक युवराज पाडळे आणि पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# करमाळा विधानसभेसाठी भावी आमदारांची अग्निपरीक्षा; मार्गदर्शकांची सत्त्वपरीक्षा

**सोलापूर । प्रा. राजेश गायकवाड**

सोलापूर जिल्ह्यातील सर्वात मोठा व लांबीचा तालुका म्हणजे करमाळा तालुका. या तालुक्यात स्वातंत्र्य काळापासून आमदार झाले आहेत. प्रत्येक आमदाराच्या पाठीमागे एक किंवा अधिक खाजगी मार्गदर्शक असतात, जे आपल्या जवळच्या मित्र, भाऊ किंवा गुरूंचे रूप धारण करतात. त्यामुळे करमाळा तालुक्यात मार्गदर्शकांचा पद अत्यंत महत्वाचा मानला जातो.

स्व. नामदेवराव जगताप यांनी तालुक्यात राजकारण करून आपला ठसा उमठवला होता. माजी मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी यशवंतसागर, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय आणि अनेक शैक्षणिक संस्था स्थापन करून गोरगरिबांना शिक्षण मिळवून दिले. त्याचप्रमाणे स्व. दिगंबररावजी बागल यांनी देखील निवडक आदर्श व्यक्ती मानून कार्य केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली माजी मंत्री स्व. प्रतापसिंह मोहिते पाटील, स्व. भैय्यु महाराज देशमुख इंदूरकर, आणि हभप प्रकाश महाराज बोधले यांच्यासोबत कार्य केले आहे.सध्याच्या काळात प्रत्येक नेत्याच्या पाठीमागे एक मजबूत नेतृत्व आहे. विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांचे राजकीय मार्गदर्शक म्हणून त्यांच्या बंधू आमदार बबनराव शिंदे हे दिसून येत आहेत. खाजगी चर्चा करण्यासाठी उद्धव दादा माळी यांचे नाव देखील प्रामुख्याने घेतले जाते. हे मार्गदर्शक नेत्यांना योग्य माहिती देऊन रणांगणात उतरवण्याचे कार्य करत आहेत.माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी त्यांच्या राजकीय प्रवासात बुजुर्ग, पितृतुल्य व्यक्ती म्हणून बिटरगावचे स्व. भगवानराव शिंदे, मांगीचे स्व. भागवत अप्पा बागल, आणि कंदरचे शंकरराव भांगे यांच्याकडे मार्गदर्शन घेतले आहे. जगताप यांनी म्हटले आहे की, माझा जगताप गट हेच खरे माझे मार्गदर्शक आहेत.माजी आमदार नारायणराव पाटील यांचे समोर सध्या एकमेव अकलूजचे मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असल्याचे दिसते. खाजगी चर्चांमध्ये प्रा. अर्जुन सरक आणि सुनिल तळेकर योग्य राजकीय सोंगटया टाकताना दिसतात.भाजपचे नेते व मकाई सह साखर कारखान्याचे माजी चेअरमन श्री. दिग्विजय बागल आणि रश्मी दीदी बागल यांनी स्व. दिगंबररावजी बागल यांच्या मृत्यूनंतर बागल गट शाबूत ठेवण्यात मोठा संघर्ष केला. दिग्विजय बागल म्हणतात, माझे मार्गदर्शक काका व दीदी आहेत.करमाळा तालुक्यातील जनतेचा विश्वास संपादन करत प्रा. रामदास झोळ यांनी सावधपणे राजकारणात प्रवेश केला आहे. शिक्षण, रोजगार व आरोग्याबाबत काहीतरी केले पाहिजे असे त्यांच्या मत आहे. त्यांनी आपल्या राजकीय मार्गदर्शकाबद्दल सांगताना सर्व सामान्य माणूस हाच माझा राजकीय मार्गदर्शक आहे, असे उत्तर दिले आहे.शिवसेना जिल्ह्याचे नेते महेश दादा चिवटे म्हणतात, माझे सर्वस्व मार्गदर्शक महाराष्ट्राचे संवेदनशील मुख्यमंत्री श्री. एकनाथरावजी शिंदे आहेत, आणि त्यांच्या आदर्शाने माझी वाटचाल आहे.गणेश चिवटे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी माझा मार्गदर्शक नंतर सांगतो, असे उत्तर दिले. करमाळा विधानसभेच्या आगामी निवडणुकीत संभाव्य आमदारांची कार्यपद्धती व मार्गदर्शकांची भूमिका महत्वाची ठरणार आहे. प्रत्येक उमेदवाराला त्याचे मार्गदर्शक म्हणून एक विश्वासार्ह नेता आवश्यक आहे, जे त्याला योग्य दिशादर्शन करतील.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# जिजाऊ संघटनेच्या वतीने कुणबी समाज भूषण पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

**जव्हार । प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्याच्या विक्रमगड तालुक्यातील झडपोली येथे जिजाऊ संघटनेच्या वतीने कुणबी समाज भूषण पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला. कोकणातील विविध क्षेत्रांमध्ये योगदान देणाऱ्या कुणबी समाजातील मान्यवरांचा सन्मान करण्यासाठी कुणबी समाज भूषण पुरस्कार २०२४ हा सोहळा आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमात उल्लेखनीय व्यक्तिमत्वांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्यात एकूण २५० व्यक्तींचा सन्मान करण्यात आला, ज्यांनी विविध क्षेत्रांत विशेष लौकीक प्राप्त केला आहे. कुणबी समाज हा शेतात मेहनत करणारा आणि देशासाठी रक्त सांडणारा आहे, आणि त्यांनी आपली परंपरा आणि सांस्कृतिक ओळख जपत महाराष्ट्रातच नाही तर जगभर आपला ठसा उमठवला आहे.समाजाच्या एकत्रिकरणासाठी आणि प्रोत्साहनासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला असल्याचे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले. कुणबी समाजातील प्रेरणादायी काम करणाऱ्या समाजबांधवांना कौतुकाची थाप मिळावी आणि इतर नवतरुणांनी त्यांचा वारसा पुढे चालवावा यासाठी हा सोहळा आयोजित केला असल्याचे माजी आमदार गोटीराम पवार यांचे सुपुत्र ठाणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सुभाष पवार यांनी सांगितले. त्यांनी निलेश सांबरे यांच्या जिजाऊ संस्थेच्या उपक्रमांचे कौतुक करताना सांगितले की, सांबरे यांचे कार्य हे समाजाने प्रेरणा घेण्यासाठी आवश्यक आहे, कारण कुठलेही राजकीय पद नसतानाही ते जे कार्य करतात ते मोठ्या सत्ताधाऱ्यांना देखील शक्य होत नाही.या कार्यक्रमात लोकसभेच्या निवडणुकीतील पराभवावर बोलताना जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष निलेश सांबरे म्हणाले, मोठ्या युती असलेल्या बलाढ्य प्रस्थापित पक्षांच्या समोर लढतीत आपल्याला मिळालेल्या मतांचा टक्का प्रभावी होता. त्यामुळे ही हार नसून जित आहे. येणाऱ्या निवडणुकीत ५ पालकमंत्री आपला कुणबी समाजातील असतील, याचे आश्वासन मी देतो. त्यांनी उपस्थितांना सांगितले की, आता आपल्या समाजाने मोठी स्वप्न बघण्याची वेळ आली आहे. कलेक्टर, डॉक्टर, सी ए , उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि प्रधानमंत्री कार्यालय चालवणारे आपले बांधव तयार आहेत. जिजाऊ संघटना समाजाला पुढे नेण्यास तत्पर आहे, मात्र कुठल्याही समाजाला न दुखवता आपल्याला आपला समाज घेऊन पुढे जायचे आहे.या कार्यक्रमास सुभाष पवार (जिल्हा परिषद उपाध्यक्ष), अशोक वालम (कुणबी एकीकरण समिती अध्यक्ष), रोहिणी शेलार (सभापती, महिला व बालकल्याण, पालघर जिल्हा), मारुती धीर्डे (शिवसेना तालुका प्रमुख), मोनिका मोहन पानवे (भिवंडी लोकसभा प्रमुख) यांसारखे मान्यवर उपस्थित होते. ठाणे आणि पालघरसह संपूर्ण कोकणातून मोठ्या संख्येने कुणबी समाज आणि समाजातील प्रतिष्ठित मान्यवर या कार्यक्रमात उपस्थित होते.



# साखर सम्राटाविरोधात हर्षदा काकडे यांचा जोरदार हल्लाबोल

**दिवटे । सुधीर जावळे**

विधानसभा निवडणुका नजीक आल्याने शेवगाव पाथर्डी मतदारसंघात विविध कार्यक्रमांची चर्चा सुरू आहे. इच्छुकांनी संवाद मेळावे, धार्मिक कार्यक्रम आणि मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले आहेत.

रविवारी (दि. २९) बोधेगाव येथे माजी जिल्हा परिषद सदस्या हर्षदा काकडे यांनी 'संकल्प विजयाचा' मेळावा आयोजित केला, ज्यामध्ये तालुक्याच्या पूर्व भागातील जोरदार शक्ती प्रदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रसिद्ध मराठी सिने अभिनेते भाऊसाहेब शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना हर्षदा काकडे म्हणाल्या, आपल्या लगतच्या तालुक्याचा विकास झाला आहे. परंतु आलटून पालटून सत्ता भोगणारे साखर सम्राट प्रस्थापित माजी सदस्य आपल्या भल्यासाठी साधे हक्काचे पाणी आणता आले नाहीत. आता त्यांना आमदारकी पाहिजे, म्हणून त्यांना ओळखा आणि त्यांची जागा त्यांना दाखवून द्या. यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये जगन्नाथ गावडे, सुरेश कुटे, अमोल शेळके, अंबर बर्डे, जलील पठाण, नरेश वडते, मानीक गर्जे, नारायण गर्जे, सुनील गायके आणि लक्ष्मण गवळी यांचा समावेश होता.हर्षदा काकडे यांनी प्रस्थापितांविरुद्ध कठोर आरोप केले. त्या म्हणाल्या, या प्रस्थापितांनी वीस–पंचवीस वर्षे सत्ता भोगली, पण स्वतःच्या फायद्यासाठी काहीही केले नाही. टक्केवारीच्या भानगडीत शेवगाव नगराच्या पाणी योजनेवर त्यांनी खोडा घातला आहे. जायकवाडी धरणामुळे शेवगाव तालुक्याची जमिनं गेली असून, पाणी मराठवाड्याकडे जात आहे; याकडे लोकप्रतिनिधींचे लक्ष नाही.अनेक विकासकामे वंचित ठेवण्याचे काम या लोकप्रतिनिधींनी केले आहे. अशा प्रकृतीच्या साखर सम्राटांच्या टोळीला लक्षवेधी ठरवून, जनतेने आता त्यांना हद्दपार करावे, असे तीव्र मत व्यक्त करताना हर्षदा काकडे यांनी उपस्थितांना आवाहन केले.



# नैसर्गिक शेती काळाची गरज: तबस्सूम मोमिन

**सिंदी । रेल्वे**

बदलत्या काळात आरोग्याची काळजी घेण्यासाठी नैसर्गिक शेती गरजेची आहे, असे विचार सरपंच प्रिती वैद्य यांनी व्यक्त केले.

सेलू तालुक्यातील खापरी येथे वेलस्पन फाउंडेशन व स्वयं शिक्षण प्रयोग यांच्या सहकार्याने नैसर्गिक शेती: काळाची गरज, आरोग्यदायी परसबाग, शेती पोषण आरोग्य यांचा परस्पर संबंध, महिलांच्या कुपोषणावर मात या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून सरपंच प्रिती वैद्य यांनी विचार मांडले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच प्रिती वैद्य होत्या, तर प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून जी. आय. झेडचे विकास, नेहा खरा, डब्ल्यू एच एचचे फिलिप्स , श्वेता बॅनर्जी, एस एस पीच्या तबस्सूम , माधव गोरकटे, नावडकर डी.टी., माधुरी दूधभाते, वेलस्पनचे दीपक खांडे, नम्रता गव्हाळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन प्रिया वैरागडे यांनी केले. याप्रसंगी वंदना चापडे, सारिका भांडेकर, मनीषा कौरती, रितू मडावी, धन्वंतरी गव्हाळे, कमल दुधबळे, उज्वला पिंपळे, निर्मला जुनघरे यांच्यासह गावातील शेतकरी व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# दिपमाला अनंतकाळस (रोडे) यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार जि. प. प्राथमिक शाळा पाडळी, तालुका करमाळा, जिल्हा सोलापूर येथील उपशिक्षिका दिपमाला भास्कर अनंतकाळस (रोडे) यांना दिनांक २८ सप्टेंबर रोजी गौरविण्यात आले.

श्रीदेवी चामाळ येथील सभागृहात करमाळा तालुक्याचे विध्यमान आमदार संजय मामा शिंदे यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन अनंतकाळस यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य ड राहुल सावंत, यश कल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे पाटील, गट विकास अधिकारी मनोज राऊत, गट शिक्षणाधिकारी जयवंत नलवडे, विस्ताराधिकारी नितीन कदम, मिनिनाथ टकले, केंद्रप्रमुख निशांत खारगे उपस्थित होते.




अनंतकाळस यांनी मुलांच्या शिक्षणासाठी विविध स्पर्धा परीक्षांची तयारी घेतली आहे. त्यांनी मुलांच्या आरोग्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. मुलांच्या गुणवत्ता वाढीसाठी इंग्रजी शब्द पाढे पाठांतर आणि अध्यापनात स्मार्ट टीव्हीचा वापर केला आहे. शैक्षणिक सहली, परिसर भेट, लोकउठाव, मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण असे अनेक उपक्रम शिक्षकांच्या मदतीने राबविले आहेत.अनंतकाळस यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाल्याबद्दल पाडळी गावातील ग्रामस्थ, सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन, शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

# धनगर घुसखोरी, पेसा भरतीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आदिवासिंचा एल्गार

**पालघर । प्रतिनिधी**

धनगर आणि आदिवासी समाजाच्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून आज राज्यभरात आदिवासी बांधवांकडून आंदोलनाची एक भाग म्हणून पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर संयुक्त आदिवासी संरक्षण समिती, आदिवासी एकता परिषद आणि विविध संघटनांचे पदाधिकारी रॅली काढून शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करत मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गेटवर सभेत रूपांतरित झाला. यावेळी, जर शासन अशीच भूमिका घेत असेल तर आदिवासी संघटना व आदिवासी समाजातील नेते रस्त्यावर उतरून आंदोलन करणार, असा ईशारा देण्यात आला.




आंदोलनाच्या ठिकाणी बोलताना, मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी वर्षा बंगल्यावर आणि सह्याद्री अतिथी ग्रहावर गेलो तरी त्यांनी आम्हाला भेट नाकारली. धनगरांच्या शंभर वेळा मिटिंग होतात, परंतु आदिवासी शिष्ट मंडळाच्या एकदाही मिटिंग होत नाही. त्यामुळे हे आदिवासींच्या विरोधी सरकार आहे, असे आंदोलकांनी स्पष्ट केले. आदिवासी शिष्ट मंडळाला भेटण्याची मुख्यमंत्र्यांची मानसिकता नसल्याचा निषेध करताना, समितीवर बंधने घालण्याची मागणी करण्यात आली. यावेळी डॉ. सुनील पऱ्हाड, काशिनाथ चौधरी, अशोक शिंगाडा, प्रसाद पऱ्हाड, माधव लिलका, राहुल धूम, परशुराम चावरे, गुरुनाथ सहारे, रामदास हरवटे, प्रकाश पाटकर, ॲड. दळवी, सागर सुतार यांनी मार्गदर्शन केले. यानंतर जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देण्यात आले. आदिवासी एकता परिषदेचे मंगेश दुबळा, चंदन ढाक, मनोज आंबात यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. विशेष म्हणजे, या आंदोलनात महिलांचा मोठा सहभाग दिसून आला.

## नरखेड येथे विविध विकासकामांचा शुभारंभ

# जनता जागृत असल्याने विकासकामे करणाऱ्यालाच काम करण्याची संधी देते–राजन पाटील

**मोहोळ । प्रतिनिधी**

पाच वर्षांपूर्वी मोहोळ विधानसभा मतदारसंघासाठी चांगल्या उमेदवाराची निवड झाल्याने मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी तब्बल ३००० कोटी रुपयांचा निधी आ. यशवंत माने यांनी आणला आहे. ज्या भागाला निधीची आवश्यकता आहे, त्या भागाला निधी देणे गरजेचे असते. मोहोळ तालुक्यातील विरोधी मंडळी विकासकामांमध्ये अडचण आणून आपली पोळी भाजण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र, जनता जागृत झाली असून विकासकामे करणाऱ्यालाच जनता निवडून देते, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष माजी आमदार राजन पाटील यांनी केले. मोहोळ तालुक्यातील नरखेड येथे मंजूर झालेल्या विविध विकासकामांचा शुभारंभ आ. यशवंत माने यांच्या शुभहस्ते व माजी आमदार राजन पाटील यांची महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नरखेड ग्रामस्थांच्यावतीने नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळी ना. पाटील अध्यक्षस्थानावरून बोलत होते.



यावेळी पुढे बोलताना राजन पाटील म्हणाले की, मागील विधानसभा निवडणुकीत यशवंत माने यांना मतदारांनी अपेक्षेपेक्षा जास्त मतदान करून विजयी केले. नरखेड भागाच्या विकासासाठी त्यांनी कोणताही गट तट पक्ष न पाहता मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. माजी राजमंत्री काही शहाजीराव पाटील व लोकनेते बाबुराव अण्णा पाटील यांच्या काळातील राजकारण हे वेगळे होते. मात्र, सध्या राजकारणाची समीकरणे बदलत चालली असून विकासावर राजकारण न करता वैयक्तिक हेवे–दाव्यावर राजकारण चालू झालेले आहे. सध्या मोहोळ विधानसभा मतदारसंघात बाहेरील लोक येऊन दोन टिपर मुरूम टाकायचा आणि आम्हाला मते द्या असे म्हणत फिरत आहेत. मोहोळ तालुका हा आजतागायत विचाराने पुढे गेलेला असून विकला गेलेला नाही. काही मंडळी तरुणांची माथी भडकवण्याचे काम करीत असून जाती–धर्माच्या नावाखाली राजकारण करत आहेत. मात्र, विकासकामे करीत असताना त्यामध्ये राजकारण आणायचे नसते, असे सांगून मोहोळ विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामे करत असताना राजकारण बाजूला ठेवले आहे. अनगर येथील अप्पर तहसील कार्यालय हे नागरिकांच्या सोयीसाठी निर्माण केले असून विरोधी मंडळी हे जनतेमध्ये गैरसमज पसरवत आहेत. विकासकामांमध्ये अडचण आणून मी राजकीय पोळी भाजण्याचे काम विरोधी मंडळी करीत आहेत. मात्र, जनता जागृत झाली असून अशा संधी साधू मंडळींना बाजूला सारल्याशिवाय जनता गप्प बसणार नसल्याचे शेवटी पाटील यांनी सांगितले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष प्रकाश चवरे, जगनाथ कोल्हाळ, बबन दगडे, हनुमंत पोटरे, चंद्रहार चव्हाण, नागेश साठे, रत्नमाला पोतदार, शुभांगी लंबे, बालाजी साठे, गोविंद पाटील, राजकुमार पाटील, यशवंत लोणारी, अमोल कादे, मोहन चव्हाण, ब्रह्मदेव चव्हाण, गणेश जगताप, ऋतुराज देशमुख, भगवान थिटे, प्रदीप साठे, शहाजी मोटे, बाळासाहेब पाटील, ब्रम्हदेव फंड, दाजी रणपिसे, पांडुरंग राऊत, प्रकाश राऊत, बापू भडंगे, शिवाजी उबाळे, उत्तम मोटे, अमर चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **“ मोहोळ तालुक्यातील लाडक्या बहीण योजनेचे ९७ टक्के अर्ज मंजूर झाले आहेत. उर्वरित राहिलेले अर्जही लवकरच मंजूर होऊन लाडक्या बहिणीच्या खात्यावर पैसे येतील. मोहोळ विधानसभा मतदारसंघातील विकासकामे करत असताना कोणत्याही प्रकारचा राजकीय दुजाभाव केला नाही. नागरिकांचे जास्तीत जास्त प्रश्न सोडविण्यावर भर दिला असून आगामी काळात देखील मतदारसंघाच्या विकासासाठी जनता नक्कीच मला साथ देईल, असे सांगून मतदारसंघाच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नसल्याचे आ. यशवंत माने यांनी सांगितले.**

# घोराडच्या पाणी पुरवठ्यात अडथळे: ग्रामस्थांमध्ये नाराजी

> **“ पाणी पुरवठा करणाऱ्या एका विहिरीवरील मोटर पंप बिघडली असून, ती दुरुस्तीसाठी पाठवली आहे. दुसऱ्या विहिरीवरील पंपाला विद्युत पुरवठ्यात अडथळे येत असल्यामुळे वीज वितरण कंपनीकडे तक्रार दाखल केली आहे. येत्या मंगळवारपासून पाणी पुरवठा वेळेवर सुरू होईल.**
> **अनिल भोगे, प्रशासक, ग्राम पंचायत घोराड**

**सेलू (घोराड) । प्रतिनिधी**

सहा हजार लोकसंख्या असलेल्या घोराड गावात पाणी पुरवठा गेल्या काही दिवसांपासून अनियमित झाल्याने ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. नळयोजनेच्या वेळापत्रकात सातत्याने बदल होत असल्याने ग्रामस्थांना नळात पाणी कधी येईल याची सकाळपासून सायंकाळपर्यंत प्रतीक्षा करावी लागत आहे.

गावातील नळयोजनेअंतर्गत तीन जलकुंभ आहेत, जे दोन ते तीन विहिरींवर अवलंबून आहेत. मात्र, गेल्या पाच ते सहा दिवसांपासून एका विहिरीवरील विद्युत मोटर पंप बिघडल्यामुळे पाणी पुरवठ्याच्या वेळेत अनियमितता आढळून आली आहे. विशेष म्हणजे, ग्राम पंचायत प्रशासनाने पाणी पुरवठ्याबाबत कोणतीही अधिकृत सूचना दिलेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी नळावर अवलंबून न राहता पारंपरिक हातपंपांचा वापर पुन्हा सुरू करावा लागत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या दहा वर्षांत असे संकट कधीही उद्भवले नव्हते. सध्या ग्राम पंचायत प्रशासनावर प्रशासक शासन आहे, आणि ग्राम विकास अधिकारी प्रभारी आहेत. ग्राम पंचायतमध्ये कोणत्याही कामासाठी गेल्यास कर वसुलीसाठी तगादा लावला जातो, मात्र विद्युत पंपाच्या दुरुस्तीच्या कामात विलंब का होतो आहे, असा प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत.ग्रामस्थांनी प्रशासनाकडून लवकरात लवकर पाणी पुरवठ्याचे नियमित वेळापत्रक घोषित करण्याची मागणी केली आहे.

## ७५ विद्यार्थ्यांना विदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर

# शासन अध्यादेश निघाला ; ना.देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारचे आभार-डॉ.अशोक जीवतोडे


**चंद्रपूर | प्रतिनिधी**

राज्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील पात्र ७५ विद्यार्थ्यांना २०२४-२५ या वर्षासाठी परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय २६ सप्टेंबरला राज्य सरकारने जारी केला.

नागपुर येथील देवगिरी बंगल्यावर ६ सप्टेंबर २०२४ ला ओबीसी संघटनांची ना. देवेंद्र फडणवीस यांचे सह बैठक पार पडली होती. राष्ट्रीय ओबीसी महासंघ व ओबीसी संघटनांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन इतर विषयांसह हा विषय प्रामुख्याने निदर्शनास आणून दिला होता. यानंतर तातडीने बैठक घेऊन पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यानंतर अवघ्या तीन दिवसांत शिष्यवृत्ती मंजूर करीत तत्परता दाखविण्यात आली. समाजहिताच्या या तत्परतेबद्दल ओबीसी संघटनांनी समाधान व्यक्त केले आहे. तर भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अशोक जीवतोडे यांनी उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व राज्यातील महायुती सरकारचे आभार मानले आहे.

राज्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशात उच्च शिक्षणासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना २०१९-२० पासून लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ३० ऑक्टोबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांची संख्या ७५ इतकी करण्यात आली आहे. २०२४-२५ या वर्षाकरिता परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सुरुवातीला अर्ज मागविण्यात आले. या अर्जांची इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाचे संचालक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने छाननी करून, अर्जांतील त्रुटींची पूर्तता करून अभ्यासक्रमनिहाय गुणवत्ता यादी तयार केली. ही यादी १० सप्टेंबरला राज्य सरकारला सादर केली. त्यानंतर इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने २३ सप्टेंबरला झालेल्या बैठकीत पात्र ७५ विद्यार्थ्यांची निवड केली आहे.

गेल्या दोन दशकांपासून आतापर्यंतचा मागोवा बघता केंद्रात मोदी सरकार व राज्यात ना. देवेंद्र फडणवीस सत्तेत असताना ओबीसी समाजाच्या हिताकरिता सर्वाधिक शासन अध्यादेश काढण्यात आले, असे भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अशोक जीवतोडे म्हणाले आहेत.या अगोदरही ना. देवेंद्र फडणवीस हे राज्य सरकारमधे असताना त्यांनी ओबीसी हिताकरिता शासन निर्णय काढले आहे. ज्यामध्ये महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र ओबीसी मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. पहिल्यांदा महाराष्ट्रात इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी १० लाख प्रधानमंत्री मोदी आवास घरकुल योजना राबविण्यात आली आहे. याचा फायदा गावागावात ओबीसी समाज बांधवांना होत आहे. ओबीसी आर्थिक विकास महामंडळास २५० कोटी एवढा निधी देण्यात आला. राज्य सरकारने ७२ वसतीगृहास मान्यता दिली व चालू सत्रात ५२ वसतिगृह सुरू केले आहे. त्यात काही सुरु झाले आहेत तर काही वसतिगृह सुरू करण्याची प्रक्रिया सुरू आहे. नागपूर येथे अखिल भारतीय ओबीसी भवन बांधण्याकरीता भरीव निधीची उपलब्धता करण्यात आली. विश्वकर्मा व मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना यामध्ये ओबीसी समाजाला लाभ मिळाला. आदी निर्णयांचा समावेश आहे.



# मान्यता प्राप्त असलेल्या देशी दारूच्या दुकानातून अवैध मार्गाने दारूची विक्री

## जिंतुर तालुक्यातील कौसडी येथील प्रकार

**कौसडी | प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथील असलेल्या सरकार मान्य देशी दारूच्या दुकानातून अवैध मार्गाने इतर गावात दारूची विक्री केली जात आहे. यामध्ये कौसडी परिसरात असलेले कुपटा, गुळखंड फाटा,आडगाव दराडे, पिंपळगाव गायके, भांगापूर, चिमणगाव यास इतर गावातील अवैध मार्गाने दारू विक्री करणारे विक्रेत्यांना देशी दारूचा पुरवठा केला जातो.




कौसडी येथील देशी दारूच्या दुकानाचा परवाना एका व्यक्तीच्या नावाने आहे तर ही देशी दारूची दुकान दुसराच व्यक्ती चालवत आहे. दारूच्या दुकानाचा परवाना भाड्याने घेतलेला आहे. परवान्याचा भाडा व कामगारांची मजुरी निघून जास्तीत जास्त मुनाफा मिळावे म्हणून सरकार मान्य असलेल्या देशी दारूच्या दुकानातून अंधाराचा फायदा घेत दररोज दोन कामगारांच्या साह्याने दुचाकीवर अंदाजे २० ते २२ देशी दारूचे बॉक्स पिंपळगाव गायके, चिमणगाव, कुपटा, गुळखंड फाटा, भांगापूर, आडगाव दराडे यासह इतर गावातील अवैध दारू विक्रेत्यांना पुरवठा केला जात आहे. अवैध मार्गाने देशी दारू विक्रीमुळे सरकार मान्य देशी दारू दुकान चालकाला मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा होत आहे.

दारूमुळे अनेक व्यक्तींनी आपले जीव गमावले असून अनेकांचे संसार मोडले आहे याच दारूमुळे गुन्हेगारी वाढत आहे. बोरी पोलीस ठाण्याचे दबंग सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गोपीनवार यांनी लक्ष देऊन सरकार मान्य देशी दारूच्या दुकानातून अवैध मार्गाने विक्री होणाऱ्या दारूच्या पुरवठ्यावर पोलिसांचा ठप्पा लावून अवैध मार्गाने दारू विक्री करणाऱ्या दुकानदाराला पोलिसगिरी दाखवणे गरजेचे आहे.

# भाजपच्या तंबूचे संजय राऊत यांना दु:ख,बांबू त्यांच्यात गेल्यावर कळेल

## महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा पलटवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**

उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे कायम वैफल्यातून टीका करत असतात. भाजपने तंबू ठोकल्याने त्यांना अतिशय दुःख झाले आहे. आता हाच बांबू त्यांच्यात गेल्यावर त्यांना भाजपची आणि सरकारची ताकद कळेल, अशा खोचक शब्दात महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संजय राऊत यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. अमित शहा यांच्यावर टीका करताना संजय राऊत यांनी त्यांनी महाराष्ट्रात तंबू ठोकला असल्याचे म्हटले होते.



संजय राऊत यांच्या या टीकेला महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना ते कायम औरंगजेबाचे उदत्तीकरण करत होते. त्यांच्याच काळामध्ये औरंगजेबाच्या कबरीवर फुले वाहिली गेली, हे जनता विसरलेली नसल्याचे विखे पाटील यांनी म्हटले आहे. आमचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एक सक्षम नेते आहेत. एका अभिमन्यू प्रमाणे कोणतेही चक्रव्यूह छेदण्याची त्यांची क्षमता आहे. आमच्या नेत्यात ताकत असल्याने विरोधक त्यांना घाबरत असल्याचे विखे पाटील यांनी म्हटले आहे.अमित शहा यांनी महाराष्ट्रात तंबू ठोकला तरी भाजपचा विजय होणार नसल्याचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले होते. भाजपने राज्याच्या तक्तावर तकलादू माणसे बसवले असल्याचा आरोप त्यांनी केला. औरंगजेबाप्रमाणे शहा देखील महाराष्ट्रावर आक्रमण करत असल्याचे ते म्हणाले. मात्र, महाराष्ट्र सगळ्यांचा माज उतरव होतो, असा इशारा देखील त्यांनी दिला होता. अमित शहा यांना जंजीर चित्रपट बघायला सांगा, असा खोचक टोला देखील त्यांनी लगावला. केंद्रीय यंत्रणा हातच असल्यामुळेच अमित शहा हे भाई असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. मात्र महाराष्ट्राला अशा भाई लोकांची गरज नसल्याची टीका त्यांनी केली. या माध्यमातून राऊत यांनी अमित शहा यांच्या महाराष्ट्र दौऱ्याचा चांगलाच समाचार घेतला होता

# महेश घेरडीकर यांची पोलीस निरीक्षक सी.आय.डी.पुणे शहर येथे निवड झाल्याबद्दल सत्कार संपन्न

**सांगोला | प्रतिनिधी**

महेश घेरडीकर यांची प्रथम सन २०१५ रोजी उपनिरीक्षक म्हणून धाराशिव येचे रुजू झाले. त्यानंतर सन २०२४रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हूणन राधानगरी येथे रुजू झाले व सन २०२४ रोजी पोलीस निरीक्षक पदी पदोन्नती झाल्याबद्दल घेरडी गावचे भारतीय नवसैनिक संजय मासाळ व त्यांच्या मित्र परिवाच्या वतीने महेश घेरडीकर यांच्या मूळ घेरडी ता सांगोला या गावी त्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी युवक नेते व उद्योजक धर्मेंद्र (पपू )कांबळे, मॉर्डर्न हायस्कूल व जुनिअर कॉलेज जे सह शिक्षक आशपाक खलिफा सर, भारतीय नवसैनिक संजय मासाळ, महेश घेरडीकर यांचे वडील व आई तसेच त्यांचे मोठे बंधू विद्यामंदिर जुनिअर कॉलेजचे प्रा गणेश , भारतीय नवसैनिक संजय मासाळ मित्र परिवार व घेरडी ग्रामस्थ. उपस्थित होते.

# सीएससी केंद्र चालकाने हडपले लाडक्या बहिणींचे पैसे:७१ जणांचे आधार कार्ड वापरुन मिळवले ३ लाख रुपये, नांदेड येथील प्रकार

**नांदेड (वृत्तसंस्था)**–राज्य सरकारने महिलांसाठी आणलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत अनेकजण गैरव्यवहार करून पैसे हडपण्याचे प्रकार समोर येत आहेत. सातारा, अकोला जिल्ह्यातील प्रकरणे ताजी असतानाच आता नांदेड जिल्ह्यात देखील त्यापेक्षा वेगळा प्रकार समोर आला आहे. नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील एका सीएससी केंद्र चालकाने आधार कार्डवर खाडाखोड करून लाडक्या बहिणींचे सुमारे ३ लाख रुपये हडप केले आहेत. हा प्रकार समोर आल्यानंतर प्रशासनाने चौकशीचे आदेश दिले आहेत. आपले बिंग फुटताच केंद्र चालक फरार झाला आहे.नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील मनाठा येथील सीएससी केंद्र चालकाने लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरताना महिलांच्या आधारकार्डसोबत छेडछाड केली. पोर्टलवर महिलांचे आधारकार्ड नंबर टाकण्याऐवजी त्यांच्या पतीचे आधारकार्ड नंबर टाकले. त्यानंतर रोजगार हमी योजनेचे पैसे आणि इतर योजनांचे पैसे आले आहेत, असे सांगून त्याने अनेकांचे आधारकार्ड आणि बँकेचे पासबुक जमा करून घेतले. याच कागदपत्रांच्या आधाराने त्याने महिलांच्या खात्यात आलेले लाडकी बहीण योजनेचे पैसे स्वत:च्या खात्यात जमा करून घेतले. लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यावर आल्यानंतर रोजगार हमी योजनेचे पैसे आले आहेत, असे सांगून त्या केंद्र चालकाने पुरुषांचे अंगठे घेतले. त्यानंतर बँकेत जमा झालेली रक्कम काढून घेतली.दरम्यान, हा प्रकार उघडकीस आल्यानंतर नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी सांगितले की, या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत. या गैरव्यवहारात कोण कोण सहभागी आहेत, ते चौकशी झाल्यानंतर समोर येतील. संबंधित सीएससी केंद्र चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या केंद्र चालकाने जवळपास ७१ जणांच्या आधार क्रमांकाचा वापर करून त्यांच्या परस्पर ३ लाख १९ हजार ५०० रुपये उचलले. मनाठा या गावातील ३८ तर बामणी फाटा गावातील ३३ जणांच्या खात्यातील पैसे उचलण्यात आले आहेत. अनेकांच्या हा प्रकार लक्षात आल्यानंतर सीएससी केंद्र चालकाचा प्रकार उघडकीस आला.

# चंद्रपूर येथे उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन केंद्र उभारण्यास मान्यता

## मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय; ना.मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना यश

### ऐकार्जुना येथे ३१ कोटी ९० लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात येणार भाजीपाला संशोधन केंद्र

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील एकार्जुना येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला अंतर्गत भाजीपाला संशोधन केंद्र स्थापन करण्यास आज दिनांक ३० सप्टेंबर २०२४ च्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी मान्यता दिली. ऐकार्जुना येथे ३१ कोटी ९० लक्ष रुपये खर्च करून भाजीपाला संशोधन केंद्र बांधण्यात येणार आहे. यासाठी राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

याअंतर्गत भाजीपाला पिकात अनुवंश शास्त्राचा अभ्यास करून सुधारित संकरीत वाण विकसित करणे व गुणवत्तापूर्वक उत्पादनास चालना देणे, भाजीपाला पिकांच्या देशी वणांचे संवर्धन करणे, दुर्मिळ अशा रान भाज्यांची संवर्धन व लागवड करणे, भाजीपाला पिकांचे दर्जेदार उत्पादनासाठी शेडनेट हाऊस, आधुनिक रोपवाटिका तंत्रज्ञान, हायड्रोपोनिक्स एरोपोनिक्स तंत्रज्ञान, ठिबक सिंचन, फर्टिगेशन इत्यादी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करणे, भाजीपाला पिकांचे बिजोत्पादन तंत्रज्ञान विकसित करणे, संरक्षित भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान विकसित करुन उत्पादन वाढविणे, भाजीपाला पिकांवर येणाऱ्या किडी व रोगांचा अभ्यास करून त्यावर नियंत्रणाचे प्रभावी उपाय शोधणे, भाजीपाला पिकांची प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि साठवणूक, प्रक्रिया उदयोगास चालना देणे, भाजीपाला पिकांच्या सुधारित लागवड



तंत्रज्ञाचे शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे ही या उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन केंद्राची उद्दिष्ट्ये असल्याचे मंत्री श्री.मुनगंटीवार यांनी सांगितले..

मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले की, मागील दोन दशकांमध्ये भाजीपाला उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. तथापि, वातावरणात होणारे बदल व त्यामुळे उद्भवणारे खोड किडीच्या समस्या, कमी टिकवण क्षमता, बदलत्या वातावरणात अनुकूल तंत्रज्ञानाचा अभाव आदी बाबींचा सामना करावा लागत आहे. विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यात प्रामुख्याने मिरची, हळद, वांगी, टोमॅटो, कांदा, फुलकोबी, पत्ताकोबी, मुळा इत्यादी भाजीपाल्याचे पिके घेतली जातात. भाजीपाला पिकांच्या लागवडीसाठी उपयुक्त जमीन, मुबलक पाणी व मजुराची उपलब्धता इत्यादी असल्याने या जिल्ह्यात भाजीपाला लागवडीस मोठा वाव आहे. सद्यस्थितीत चंद्रपूर जिल्ह्याच्या एकार्जुना येथे कृषी संशोधन केंद्र कार्यरत आहे. मात्र, दिवसेंदिवस भाजीपाला पिकांची वाढती मागणी, चांगला बाजारभाव व प्रक्रियायुक्त पदार्थ बनविण्यासाठी असलेल्या संधी आदी बाबी पाहता भाजीपाला पिकांच्या उत्पादकतेमध्ये वाढ होण्यासाठी उच्च तंत्रज्ञान युक्त भाजीपाला संशोधन केंद्र उभारणे आवश्यक होते असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाविषयी माहिती देणे, गुणवत्तापूर्ण बिजोत्पादन, काढणी पश्चात तंत्रज्ञान, प्रशिक्षण तसेच मार्गदर्शन करण्यासाठी या संशोधन केंद्र स्थापनेस मान्यता देण्यात आली आहे. या संशोधन केंद्रासाठी १० पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली असल्याचेही पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.